**प्राथमिक शिक्षणाची व्याख्या व स्तर (इ.१ ली ते ८ वी) (Elementary Cycle ) मध्ये सुधारणा. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ प्रमाणे.**

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय,क्रमांक:प्राशातु-१११२/(२५८/२०१२)/प्राशि-३.
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १३ फेब्रुवारी, २०१३.

**वाचा -** १) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९.
२) महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११.

**प्रस्तावना:-**

राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना गुणात्मक व दर्जेदार शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाची असल्याने महाराष्ट्र शासनाने सर्वत्र प्राथमिक व माध्यमिक शाळा उपलब्ध करुन दिल्या आहेत. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनामार्फत सध्या सुमारे १ लाख प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरु असून त्यात सुमारे १.८० कोटी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या १ लाख शाळांपैकी सुमारे ३२५७३ शाळा खाजगी आहेत. (अनुदानित २०,४५५, विना अनुदानित १२,०१८)

२. सध्या राज्यात इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत दिल्या जाणा-या शिक्षणाला वेगवेगळया परिस्थितीमध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संबोधण्यात येते:-

| | | | |
|---|---|---|---|
| i) | इ.१ ली ते ४ थी चे वर्ग असणारी शाळा | - | प्राथमिक |
| ii) | इ.१ ली ते ७ वीचे वर्ग असणारी शाळा | - | उच्च प्राथमिक |
| iii) | इ.१ ली ते १० वीचे वर्ग असणारी शाळा | - | माध्यमिक |
| iv) | इ.१ ली ते १२ वीचे वर्ग असणारी शाळा | - | उच्च माध्यमिक |
| v) | इ.५ वी ते १० वीचे वर्ग असणारी शाळा | - | माध्यमिक |
| vi) | इ.५ वी ते १२ वीचे वर्ग असणारी शाळा | - | उच्च माध्यमिक |
| vii) | इ.८ वी ते १० वीचे वर्ग असणारी शाळा | - | माध्यमिक |
| viii) | इ.८ वी ते १२ वीचे वर्ग असणारी शाळा | - | उच्च माध्यमिक |

वरील वर्गीकरणामुळे शैक्षणिक स्तराच्या रचनेत एकवाक्यता राहत नाही आणि काम करत असताना संदिग्धता निर्माण होते.

३. सन २००२ मध्ये भारतीय घटनेत दुरुस्ती करुन ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण (इ. १ ली ते ८ वी) त्याचा मुलभूत अधिकार करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने केंद्र शासनाने **"बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार, अधिनियम, २००९"** हा कायदा पारीत केला असून त्याची अंमलबजावणी दिनांक १ एप्रिल, २०१० पासून सुरु झालेली आहे. या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने **"महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११"** नियम अधिसूचित केलेले आहेत.

४. **बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील काही ठळक कलमे खालीप्रमाणे आहेत :-

(i) **कलम-२(f)** Elementary Education means the education from first class to eighth class

(ii) **कलम-३ (१)** Every child of the age of six to fourteen years shall have a right to free and compulsory education in a neighbourhood school till completion of elementary education.

(iii) **कलम - ६** For carrying out the provisions of this Act, the appropriate Government and the local authority shall establish, within such area or limits of neighbourhood, as may be prescribed, a school, where it is not so established, within a period of three years from the commencement of this Act.

(iv) **कलम-८(b)**- Ensure availability of neighbourhood school as specified in section 6"

(v) "महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११.

कलम-२ (m) खालीलप्रमाणे आहे :-

"Neighbourhood school" means a school in respect of children in Class I-V, a school shall be established as far as possible within a distance of one k.m. of the neighbourhood and has minimum of 20 children in the age group of 6 to 11 years available and willing for enrollment in that school in classes VI-VIII, a school shall be established as far as possible within a distance of 3 k.m.s of the neighbourhood and which has not less than 20 children in class 5th of the feeding primary schools, taken together, available and willing for enrollment in that school.